**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: अदाणी कॉर्पोरेट हाऊस,
शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलच्या जवळ, खोडियार,
अहमदाबाद ३८२४२१, गुजरात.
Website: www.adanielectricity.com
सीआयएन: यू७४९९९जीजे२००८पीएलसी१०७२५६

# जाहीर सूचना

**आर्थिक वर्ष २०२२–२३ आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ च्या अचूक समायोजनाला मंजुरी मिळण्यासाठी, तसेच एमईआरसी (बहु–वर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२४–२५ च्या तात्पुरत्या समायोजनासाठी आणि एमईआरसी (बहु–वर्षीय वीजदर) विनियम, २०२४ नुसार पाचव्या बहुवार्षिक दरपत्रक नियंत्रण कालावधीच्या म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५–२६ ते आर्थिक वर्ष २०२९–३० मधील एकूण आवश्यक महसुलाच्या (ए आर आर) मंजुरीसाठी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड च्या (पारेषण व्यवसाय) याचिकेवर हरकती व सूचना मागवण्याबाबत. (केस क्रमांक १८४/२०२४)**

१. आर्थिक वर्ष २०२२–२३ आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ च्या अचूक समायोजनाला मंजुरी मिळण्यासाठी, तसेच एमईआरसी (बहु–वर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२४–२५ च्या तात्पुरत्या समायोजनासाठी आणि एमईआरसी (बहु–वर्षीय वीजदर) विनियम, २०२४ नुसार पाचव्या बहुवार्षिक दरपत्रक नियंत्रण कालावधीच्या म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५–२६ ते आर्थिक वर्ष २०२९–३० मधील एकूण आवश्यक महसुलाच्या (ए आर आर) मंजुरीसाठी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड – (पारेषण व्यवसाय) ने (एईएमएल–टी) याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने ही याचिका **९ डिसेंबर २०२४** रोजी दाखल करून घेतली असून यासंदर्भात वीज कायदा २००३ च्या कलम ६४ (२) नुसार जाहीर सूचना प्रसिद्ध करून त्या सूचनेद्वारे जनतेकडून सूचना व आक्षेप मागविण्याचे आदेश एईएमएल–टी ला दिले आहेत.

३. या याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खाली दिली असून त्यातील मंजूर आकडेवारी ही केस क्रमांक २३० / २०२२ मधील एमईआरसीच्या ३१ मार्च २०२३ च्या आदेशानुसार (मध्यावधी आढावा आदेश) आहे.

**तक्ता एक: आर्थिक वर्ष २०२२–२३, आर्थिक वर्ष २०२३–२४ आणि आर्थिक वर्ष २०२४–२५ या कालावधीतील परिचलन कामगिरी**

| क्र | तपशील | आर्थिकवर्ष २०२२–२३ | | आर्थिकवर्ष २०२३–२४ | | आर्थिकवर्ष २०२४–२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमईआरसी एमवायटी नियम, २०१९ | प्रत्यक्ष | एमईआरसी एमवायटी नियम, २०१९ | प्रत्यक्ष | एमईआरसी एमवायटी नियम, २०१९ | प्रस्तावित |
| १ | उपलब्धता (%) | ९८.०० | ९९.७९ | ९८.०० | ९९.७८ | ९८.०० | ९८.०० |

**तक्ता २: आर्थिकवर्ष २०२२–२३ आणि आर्थिकवर्ष २०२३–२४ च्या अचूक समायोजनासाठीचे भांडवलीकरण, आर्थिकवर्ष २०२४–२५ चे तात्पुरते समायोजन आणि आर्थिकवर्ष २०२५–२६ ते आर्थिकवर्ष २०२९–३० यांचा अंदाज (रु. कोटींमध्ये)**

| क्र. | तपशील | आर्थिकवर्ष २०२२–२३ | | आर्थिकवर्ष २०२३–२४ | | आर्थिकवर्ष २०२४–२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश | अंदाज |
| १ | भांडवलीकरण | ६.२३ | ६.१०* | १०६.३२ | ९९.३०* | ११५१.४० | ११३८.९४ |

| क्र. | तपशील | आर्थिकवर्ष २०२५–२६ | आर्थिकवर्ष २०२६–२७ | आर्थिकवर्ष २०२७–२८ | आर्थिकवर्ष २०२८–२९ | आर्थिकवर्ष २०२९–३० |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | भांडवलीकरण | ३८६.६५ | ६११.९६ | १८९९.६४ | २३९६.७७ | २३२२.३३ |

*भांडवलीकरणातून परिचलन आणि देखभाल यात वर्ग केलेले खर्च वगळून

**तक्ता ३: आर्थिकवर्ष २०२२–२३ आणि आर्थिकवर्ष २०२३–२४ च्या एआरआर चे अजूक समायोजन, आणि आर्थिकवर्ष २०२४–२५ च्या एआरआर चे तात्पुरते समायोजन (रु. कोटींमध्ये)**

| क्र. | तपशील | आर्थिकवर्ष २०२२–२३ | | आर्थिकवर्ष २०२३–२४ | | आर्थिकवर्ष २०२४–२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश | अंदाज |
| १ | परिचनल आणि देखभाल खर्च | ५६.७६ | ६४.६३ | ५८.४८ | ६३.३७ | ६२.०३ | ६४.१७ |
| २ | सर्वोच्च न्यायालयाच्या भविष्य निर्वाह निधी संदर्भातीलआदेशाचा परिणाम | ०.१५ | ०.११ | ०.१५ | ०.०७ | ०.१५ | ०.०७ |
| ३ | भांडवलीकरणातून परिचलन आणि देखभाल यात वर्ग केलेले खर्च | – | ३.८३ | – | ०.४८ | – | – |
| ४ | घसाऱ्याचा खर्च | ९६.४३ | ९५.२२ | ९९.०३ | १०२.३६ | १२८.४६ | १२३.६३ |
| ५ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ४५.१८ | ४८.७० | ४०.३२ | ४३.९५ | ६७.५३ | ७४.२६ |
| ६ | कार्यरत भांडवलावरील व्याज | ६.४८ | १२.६३ | ६.८९ | ७.७६ | ७.०४ | ७.८३ |
| ७ | वित्तपुरवठा शुल्क | – | ०.५३ | – | ०.७१ | – | – |
| ८ | विदेशी चलन दरातील फरक | – | – | – | १७.०९ | – | – |
| ९ | आकस्मिकता गंगाजळीतील योगदान | ५.३४ | ५.३४ | ५.३६ | ५.३५ | ५.६२ | ५.५९ |
| १० | एकूण महसुली खर्च | २१०.३५ | २३०.९९ | २१०.२३ | २४१.१४ | २७०.८३ | २७५.५५ |
| ११ | समभाग भांडवलावरील परतावा | ११५.९३ | १२८.३४ | ११८.७९ | १३१.०५ | १५०.७९ | १४९.७८ |
| १२ | एकूण आवश्यक महसूल | ३२६.२८ | ३५९.३३ | ३२९.०२ | ३७२.२० | ४२१.६२ | ४२५.३३ |
| १३ | उणे: बिगर–दर उत्पन्न | ३.९८ | ५.६६ | ३.९८ | ८.५१ | ३.९८ | ८.५१ |
| १४ | अधिक: टीएसयू साठीचे लवकर रक्कम भरणा प्रोत्साहन देय | – | ०.३२ | – | ०.३४ | – | – |
| १५ | अधिक: आर्थिकवर्ष २०२२–२३ पर्यंतच्या महसुलातील तफावत/ (अतिरिक्त) वहन शुल्कासह | – | – | ४८.०० | ४८.०० | (४२.९४) | (४२.९४) |
| १६ | अधिक: परिचलन आणि देखभाल खर्चाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / तोटा विभागणी | – | (४.८५) | – | (२.४०) | – | – |
| १७ | अधिक: खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / (तोटा) विभागणी | – | (४.१६) | – | (०.२२) | – | – |
| १८ | पारेषण शुल्कातून निव्वळ एकूण आवश्यक महसूल | ३२२.३० | ३४४.९९ | ३७३.०४ | ४०९.४० | ३७४.७१ | ३७३.८८ |
| १९ | पारेषण शुल्काचा महसूल | ३३९.७७ | ३३९.९० | ३७३.०४ | ३७९.५५ | ३७४.७१ | ३७४.७१ |
| ए | वितरण परवान्यांसह दीर्घकालीन टीएसयू | ३३९.७७ | ३३९.९० | ३७३.०४ | ३७३.०८ | ३७४.७१ | ३७४.७१ |
| बी | अतिरिक्त पारेषण शुल्क | – | – | – | ०.३२ | – | – |
| सी | अंशतः मुक्त प्रवेश शुल्काचे उत्पन्न | – | – | – | ६.१५ | – | – |
| २० | महसुलातील तफावत / (अतिरिक्त) | (१७.४७) | ५.०९ | ० | २९.८५ | ० | (०.८३) |

**तक्ता ४: आर्थिक वर्ष २०२४–२५ पर्यंतची महसुलातील एकत्रित तफावत / (अतिरिक्त) (रु.कोटीमध्ये)**

| (अतिरिक्त) | (रु.कोटीमध्ये) |
|---|---|
| आर्थिकवर्ष २०२२–२३ ची महसुलातील वाढीव तफावत / (अतिरिक्त) | २२.५६ |
| आर्थिकवर्ष २०२२–२३ च्या महसुलातील वाढीव तफावतीचा वहन / (धारण) खर्च | ५.१८ |
| आर्थिकवर्ष २०२३–२४ ची महसुलातील तफावत / (अतिरिक्त) | २९.८५ |
| आर्थिकवर्ष २०२३–२४ च्या महसुलातील वाढीव तफावतीचा वहन / (धारण) खर्च | ६.२० |
| आर्थिकवर्ष २०२४–२५ ची हंगामी महसुली तफावत / (अतिरिक्त) | (०.८३) |
| **एकूण** | **६२.९७** |

**तक्ता ५: आर्थिकवर्ष २०२५–२६ ते आर्थिकवर्ष २०२९–३० ची अंदाजित एकूण महसुली गरज (रु. कोटींमध्ये)**

| क्र. | तपशील | आर्थिकवर्ष २०२५–२६ | आर्थिकवर्ष २०२६–२७ | आर्थिकवर्ष २०२७–२८ | आर्थिकवर्ष २०२८–२९ | आर्थिकवर्ष २०२९–३० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिचलन आणि देखभाल खर्च* | ९९.५५ | ९२.२५ | १०१.०० | ११५.२८ | १३२.५५ |
| २ | घसारा खर्च | १५२.९६ | १५९.१७ | २०५.८४ | ३०१.२८ | ४०२.८५ |
| ३ | भांडवली कर्जावरील व्याज | ११०.९६ | १२८.९० | १९३.५२ | ३०९.४९ | ४३०.०५ |
| ४ | कार्यरत भांडवलावरील व्याज | १२.९२ | १३.०२ | १६.२८ | २३.०४ | ३०.६७ |
| ५ | आकस्मिक गंगाजळीतील योगदान | ८.४४ | ९.४० | १०.९३ | १५.६८ | २१.६८ |
| ६ | एकूण महसुली खर्च | ३८४.८२ | ४०२.७५ | ५२७.५७ | ७६४.७७ | १०१७.७९ |
| ७ | समभाग भांडवलावरील परतावा | २०८.८० | २३६.९४ | ३०७.६९ | ४२८.७३ | ५६१.६७ |
| ८ | उणे: बिगर–दर उत्पन्न | ८.७६ | ९.८० | १२.२४ | १६.८८ | २४.८४ |
| ९ | निव्वळ एकूण आवश्यक महसुल | ५८४.८६ | ६२९.८८ | ८२३.०१ | ११७६.६२ | १५५४.६३ |
| १० | अधिक: आर्थिकवर्ष २०२४–२५ पर्यंतची मागील महसुली तफावत / (अतिरिक्त) | ६२.९७ | – | – | – | – |
| ११ | एकूण आवश्यक महसूल | ६४७.८३ | ६२९.८८ | ८२३.०१ | ११७६.६२ | १५५४.६३ |

* परिचलन आणि देखभाल खर्च यात, वर्सोव्याच्या ई एच व्ही स्टेशनच्या भूखंडाचे म्हाडा ला देय असलेले लिज रेंट तसेच विभाजित सेवा खर्च या अतिरिक्त खर्चाचा समावेश आहे.

४. याचिकेची सविस्तर कागदपत्रे आणि याचिकेचा ठळक सारांश हा एईएमएलच्या वेबसाईटवर www.adanielectriciy.com/corporate/regulatory तसेच आयोगाच्या वेबसाईटवर www.merc.gov.in डाऊनलोड करता येण्याजोग्या स्वरूपात नि:शुल्क उपलब्ध आहे.

५. खालील कागदपत्रे लेखी स्वरुपात मागणी केल्यास एईएमएलच्या कार्यालयातून देखील मिळू शकतील.

ए) प्रस्तावाचा ठळक सारांश (नि:शुल्क, मराठी / इंग्रजीत)

बी) याचिकेची सविस्तर कागदपत्रे सीडी सह (इंग्रजीत), (रोख किंवा डीडी स्वरूपात शंभर रुपये दिल्यावर), मुंबईत देय असलेले डीडी अवरपळ **Electricity Mumbai Limited** या नावावर काढावेत.

सी) याचिकेची सविस्तर कागदपत्रे (इंग्रजीत) (पन्नास रुपये दिल्यावर)

डी) याचिकेच्या सविस्तर कागदपत्रांची सीडी (इंग्रजीत) (पन्नास रुपये दिल्यावर)

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी क्र. | ई मेल |
|---|---|---|---|
| मुंबई कार्यालय | श्री. विवेक मिश्रा, अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७ / ए (नवीन), ४०८ (जुने), एकसर गाव, देविदास लेन, एस व्ही पी रोड जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ | + ९१–२२–५०५४८७५० | vivek.g.mishra@adani.com |

६. या याचिकेवर या नोटिशीद्वारे जनतेकडून सूचना / आक्षेप मागवाव्यात असे निर्देश आयोगाने एईएमएल–टी ला दिले आहेत. प्रसिद्ध झालेल्या जाहीर सूचनेनुसार ज्या व्यक्तीला सूचना / आक्षेप मांडावयाच्या असतील अशी प्रत्येक व्यक्ती त्या सूचना / आक्षेप इंग्रजी किंवा मराठीत लेखी स्वरूपात आयोगाच्या वेबसाईटवरील (www.merc.gov.in/e-public-consultation) **इ पब्लिक कन्सल्टेशन** बटनावर क्लिक करून अपलोड करूशकेल. यात काही अडचणी आल्यास संबंधित व्यक्तींनी एमइआरसी कार्यालयात सर्व कार्यालयीन दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळात मोबाईल क्रमांक ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ईमेल आयडी वर संपर्क साधावा.

७. **इ पब्लिक कन्सल्टेशन** बटनावर क्लिक करून ज्या व्यक्तींनी आपल्या सूचना / आक्षेप अपलोड केल्या असतील त्यांना आपल्या म्हणण्याची लिखित प्रत सादर करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सूचना / आक्षेप सादर करता येत नसतील त्यांनी त्यांची लिखित प्रत, **द सेक्रेटरी, महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटरी कमिशन (एमईआरसी), तेरावा मजला, सेंटर क्रमांक एक, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४००००५** येथे द्यावी. मात्र ही प्रत, श्री. विवेक मिश्रा, अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७ / ए (नवीन), ४०८ (जुने), एकसर गाव, देविदास लेन, एस व्ही पी रोड जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ (ई–मेल : vivek.g.mishra@adani.com) यांना सादर केल्याची पोचपावती देखील सोबत जोडावी. सोबत संबंधित व्यक्तीचे पूर्ण नाव, पत्ता आणि असल्यास ई–मेल आयडी देखील द्यावा. **३ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजल्यानंतर** आलेल्या सूचना / आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. याखेरीज अन्य माध्यमातून दाखल केलेल्या सूचना / आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

८. आलेल्या प्रत्येक सूचना / आक्षेप मिळाल्यापासून तीन दिवसात आणि **तीन जानेवारी २०२५** पर्यंत आलेल्या सर्व सूचना / आक्षेपांवर **सहा जानेवारी २०२५** पर्यंत एईएमएल–टी तर्फे उत्तर दिले जाईल. एईएमएलटी तर्फे दिलेल्या उत्तरांवर संबंधितांना आपले म्हणणे ऑनलाइन जनसुनावणीत किंवा **११ जानेवारी २०२५** पर्यंत मांडता येईल.

९. **जर वरील परिच्छेद सहा नुसार** कोणा व्यक्तीने आपल्या सूचना / आक्षेप दाखल केल्या असतील व त्याला ऑनलाइन जनसुनावणीत आपले म्हणणे मांडावयाचे असेल तर त्याने आपल्या सूचना / आक्षेप सादर करतानाच ती बाब ठळकपणे नमूद करावी. अशा प्रकरणात आपला वैध ई–मेल आयडी आणि मोबाईल नंबर देणे बंधनकारक आहे. अशा हरकती घेणाऱ्या व्यक्तीला जन सुनावणीत आपले म्हणणे मांडण्याची संधी आयोग आपल्या अधिकारात देऊ शकेल. ही ऑनलाइन जनसुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून **८ जानेवारी २०२५** रोजी **सकाळी साडेदहा वाजता** होईल व त्यासाठी वेगळी नोटीस दिली जाणार नाही.

१०. आयोगाने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केलेल्या, आयोगासमोरील याचिकेच्या ऑनलाईन सुनावणी दरम्यान पाळावयाची परिचलन कार्यपद्धती आणि शिष्टाचार, या संदर्भातील रीतींच्या निर्देशांचे पालन, या ऑनलाइन जनसुनावणीसाठी हजर राहणाऱ्या सर्व व्यक्तींनी, केले पाहिजे.

स्वाक्षरी

**स्थळ :** मुंबई
**तारीख :** १२ डिसेंबर २०२४

**किशोर पाटील**
अधिकृत स्वाक्षरीकर्ता